**Parvatibai Chowgule College of Arts & Science**
**(Autonomous)**
**Margao – Goa**

# MINUTES OF THE MEETING OF THE BOARD OF STUDIES IN MARATHI HELD ON 14th OCTOBER, 2017 AT 10.00AM.

Vide Chowgule College notice (F.133(C)/1055 dated 26th September, 2017) a meeting of this BOS was convened on 14th October, 2017 at 10.00 am at the conference room, Parvatibai Chowgule College of Arts & Science, Margao – Goa. Since the number of members present represented the Quorum, the BOS began its proceedings.

Minutes are presented in the format.

Members present:

1. Shri. Shrikrishna Adsul - Chairman
2. Dr. Sunita Umraskar – Academic Council Nominee
3. Dr. Nidhee Patwardhan – Academic Council Nominee
4. Dr. Pramada Desai - Vice-Chancellor's Nominee, Goa University
5. Ms. Kurtarkar Rutuja Alias Ravina Shekhar - Industry/Corporate sector Representative
6. Ms. Ugam Umesh Parab – Alumni
7. Ms. Sarika Advilkar – Member Secretary
8. Ms. Sonia Sawant - Member

Proceedings

The Chairperson welcomed the members of the Board of Studies (BOS). The Chairperson introduced and explained the agenda for the meeting and Board transacted the following business:

Agenda Items:

1. To revise the syllabus of B.A. Marathi for Semester I to VI
2. Any Other Business (A.O.B.)

PART A: Resolution

1. The syllabi of the semester I to VI undergraduate courses were presented and discussed at the meeting. After minor changes the BOS resolved to pass the syllabi for the following undergraduate courses:

| Sr. No. | COURSES | Nature of the Course | UG Level at which Offered |
|---|---|---|---|
| **(SEMESTER I)** | CORE PAPER | | |
| 1. | **MAR-I.C-1** मराठी कथा स्वरूप आणि उपयोजन (1945 – 2000) | Core | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-I.C-2** आधुनिक मराठी कविता स्वरूप व उपयोजन (आरंभ ते 2000) | Core | B.A. (MARATHI) |
| | OPTIONAL PAPER | | |
| 1. | व्यावहारिक मराठी | Optional | B.A. (MARATHI) |
| | | | |
| **(SEMESTER II)** | CORE PAPER | | |
| 1. | **MAR-II.C-3** मराठी कादंबरी स्वरूप व उपयोजन (1945-2000) | Core | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-II.C-4** मराठी नाटक स्वरूप व उपयोजन (1950 - 2000) | Core | B.A. (MARATHI) |
| | OPTIONAL PAPER | | |
| 1. | मराठी वाचन – लेखन कौशल्य | Optional | B.A. (MARATHI) |
| | | | |
| (**SEMESTER III)** | CORE PAPER | | |
| 1. | **MAR-III.C-5** काव्यशास्त्र (भारतीय व पाश्चात्य) | Core | B.A. (MARATHI) |
| | ELECTIVE PAPER | | |
| 1. | **MAR-III.E-1** प्राचीन मराठी वाङ्मय (प्रारंभ – 1650) | Elective | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-III.E-2** मराठी ललित गद्य स्वरूप आणि उपयोजन | Elective | B.A. (MARATHI) |
| 3. | **MAR-III.E-3** साहित्याभिरूचीचे स्वरूप | Elective | B.A. (MARATHI) |
| 4. | **MAR-III.E-4** गोमंतकीय मराठी साहित्य: समीक्षा आणि संशोधन (कविता, कथा, कादंबरी, बालसाहित्य) | Elective | B.A. (MARATHI) |
| | | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (**SEMESTER IV)** CORE PAPER | | | |
| 1. | **MAR-IV.C-6** रसविचार आणि समीक्षाविचार | Core | B.A. (MARATHI) |
| ELECTIVE PAPER | | | |
| 1. | **MAR-IV.E-5** प्राचीन मराठी वाङ्मय (1651 – 1818) | Elective | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-IV.E-6** प्रवासवर्णनः एक अभ्यास | Elective | B.A. (MARATHI) |
| 3. | **MAR-IV.E-7** कार्यक्रम संयोजन व संचालन कौशल्य | Elective | B.A. (MARATHI) |
| 4. | **MAR-IV.E-8** गोमंतक आणि कोकण या प्रदेशातील लोककला | Elective | B.A. (MARATHI) |
| **(SEMESTER V)** CORE PAPER | | | |
| 1. | **MAR-V.C-7** व्याकरण | Core | B.A. (MARATHI) |
| ELECTIVE PAPER | | | |
| 1. | **MAR-V.E-9** मराठी वाङ्मयाचे सांस्कृतिक स्वरूप | Elective | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-V.E-10** आत्मचरित्रः साहित्यप्रकार आणि उपयोजन | Elective | B.A. (MARATHI) |
| 3. | **MAR-V.E-11** पत्रकारिताः स्वरूप आणि कौशल्ये | Elective | B.A. (MARATHI) |
| 4. | **MAR-V.E-12** भाषिक कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास | Elective | B.A. (MARATHI) |
| INTER DISCIPLINARY PAPER | | | |
| 1. | **MAR-III ID-1** मराठी पथनाट्यः स्वरुप व सादरीकरण | Inter Disciplinary | B.A. (MARATHI) |
| | | | |
| **(SEMESTER VI)** CORE PAPER | | | |
| 1. | **MAR-VI.C-8** भाषाविज्ञान | Core | B.A. (MARATHI) |
| ELECTIVE PAPER | | | |
| 1. | **MAR-VI.E-13** मुक्तीपूर्व गोमंतकीय मराठी वाङ्मय | Elective | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-VI.E-14** मराठी प्रादेशिक कादंबरी : स्वरुप आणि उपयोजन | Elective | B.A. (MARATHI) |
| 3. | **MAR-VI.E-15** भाषांतर विद्या | Elective | B.A. (MARATHI) |
| 4. | **MAR-VI.E-16** माहितीपट (डॉक्युमेंटरी) : लेखन आणि उपयोजन | Elective | B.A. (MARATHI) |
| INTER DISCIPLINARY PAPER | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | **MAR-VI.ID-2** मराठी एकांकिका: स्वरुप व सादरीकरण | Inter Disciplinary | B.A. (MARATHI) |

**Semester I**

1.1.1 सर्वप्रथम पहिला कोअर पेपर, *मराठी कथा स्वरूप आणि उपयोजन (1945 – 2000)* चर्चेसाठी घेण्यात आला. या पेपरच्या रचनेमध्ये फेरबदल आवश्यक नसून केवळ उपयोजनासाठी निवडलेल्या कथा बदलून घेण्यात याव्यात असे सर्वमताने ठरवण्यात आले.

1.1.2 अभ्यासमंडळातील सदस्य डॉ. प्रमदा देसाई, डॉ. निधी पटवर्धन, डॉ. सुनिता उम्रसकर व प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी नियोजित कालखंडातील निवडक कथा व कथाकारंची यादी तयार केली. कथानिवडीची जबाबदारी सदस्यांनी विभागून घेतली. सदर कथा व लेखक यांची निवड करून सदस्यांनी 10 दिवसांच्या आत मंडळाला कळवावे असे अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांकडून सूचित करण्यात आले.

1.1.3 कथेच्या उपलब्ध संपादनाऐवजी अभ्यासमंडळाने स्वतः निवडक कथांचे संपादन करून ते पुस्तक स्वरूपात प्रकाशित करावे असे प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी सुचवले व संपादक मंडळाची निवड करण्यात आली ती खालील प्रमाणेः

डॉ. प्रमदा देसाई
डॉ. निधी पटवर्धन
डॉ. सुनिता उम्रसकर
प्रा. सारिका आडविलकर

1.2.1 दुसरा कोअर पेपर *मराठी कविता स्वरूप व उपयोजन (आधुनिक कविता 1945 पर्यंत)* या पेपर मधील कवितेचा कालखंड बदलणे आवश्यक असल्याचे प्रा. सारिका आडविलकर यांनी सुचवले. यावर सदस्यांनी चर्चा करून प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी 2000 पर्यंतचा कालखंड घेण्यात यावा असे सुचवले. चर्चेनंतर या पेपरचे शीर्षक ***आधुनिक मराठी कविता स्वरूप व उपयोजन (आरंभ ते 2000)*** असे ठरवण्यात आले. याला सर्व सदस्यांची मान्यता मिळाली.

1.2.2 कवितेच्या पेपरमध्ये उपयोजनासाठी पाठ्यपुस्तके निवडून सदस्यानीं समितीला सूचित करावे असे कळवण्यात आले. याची जबाबदारी प्रा. सोनिया सावंत यांच्यावर सोपवण्यात आली.

1.3.1 पायाभूत अभ्यासक्रमातील व्यावहारिक मराठी या पेपरमध्ये शुद्धलेखनाच्या नियमांचा

अंतर्भाव करावा असे डॉ. निधी पटवर्धन यांनी सुचवले. ही सूचना सर्वांनी मान्य केली.

1.3.2 वरील सूचना अमलात आणण्यासाठी नियोजित विषयांची फेरमांडणी करून काही विषय वगळण्यात आले.

1.3.3 चर्चेअंती टिप्पणी लेखनाऐवजी शुद्धलेखनाचे नियम, कार्यालयीन पत्रलेखनाच्या तासिका 10 ऐवजी 5 करण्यात आल्या. अभ्यासक्रमातील शेवटचा विषय, 'निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्र, शुभसंदेश, मुखपृष्ठ व मलपृष्ठ' यातील शुभसंदेश, मुखपृष्ठ व मलपृष्ठ भाग स्मरणिका संपादनामध्ये येत असल्याने हा संपूर्ण विषय बदलून त्याऐवजी मुद्रितशोधन या विषयाचा अंतर्भाव केला जावा असे सुचवण्यात आले.

1.3.4 या पेपरच्या संदर्भ सूचीमध्ये डॉ. सुहासकुमार बोबडे लिखित तसेच डॉ. गं. ना. जोगळेकर लिखित 'व्यावहारिक मराठी' या पुस्तकांचा समावेश करावा असे प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी सुचवले.

सत्र एक मधील वरील पेपर संदर्भात केलेल्या सूचना सर्व सदस्यांनी मान्य केल्या.

**Semester II**

1.1.1 *मराठी कादंबरी स्वरूप व उपयोजन (आरंभ ते 1920)* या कोअर पेपरचा कालखंड व उपयोजनासाठी असलेले पाठ्यपुस्तक बदलले जावे अशी सूचना प्रा. सारिका आडविलकर यांनी केली. चर्चेनंतर 1945 ते 2000 पर्यंतचा कालखंड निश्चित करण्यात आला.

1.1.2 वरील बदलानंतर या पेपरचे पूर्वनियोजित शीर्षक बदलून ते *मराठी कादंबरी स्वरूप व उपयोजन (आरंभ ते 1920)* याऐवजी ***मराठी कादंबरी स्वरूप व उपयोजन (1945 – 2000)*** असे करण्यात आले.

1.1.3 उपयोजनासाठी कादंबरी व लेखकांची नावे निडण्यात आली व त्यातून सदस्यांच्या एकमताने कादंबरी निवडली जाईल असे ठरवण्यात आले.

1.2.1 नाटक या साहित्यप्रकारावरील, *मराठी नाटक स्वरूप व उपयोजन (1950 - 2000)* या कोअर पेपरमध्ये फेरबदल आवश्यक नसल्याचे प्रा. सारिका आडविलकर यांनी सुचवले. यावर उपयोजित स्तरावरील पाठ्यपुस्तक बदलले जावे असे डॉ. प्रमदा देसाई यांनी सुचवले.

1.2.2 वरील विषयातील पाठ्यपुस्तक निवडीसाठी मंडळातर्फे नाटक व नाटककरांची नावे सुचवण्यात आली. ज्या नाटकांवर साहित्यिक अंगाने समीक्षा झालेली आहे किंवा करण्यास वाव आहे अशाच पुस्तकांचा अंतर्भाव केला जावा असे प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी सुचवले.

1.3.1 पायाभूत अभ्यासक्रमातील *मराठी वाचन लेखन कौशल्य* या पेपरमध्ये मुलाखत लेखन या विषयाचा अभ्यास करताना संवाद लेखन हा विषय त्यात येत असल्यामुळे संवाद लेखनाऐवजी विरामचिन्हे या विषयाचा अंतर्भाव व्हावा असे डॉ. निधी पटवर्धन यांनी सुचवले.

1.3.2 वरील सूचना चर्चेअंती मान्य करून नियोजित पेपरमधील संवाद लेखन, सारांश लेखन व रसग्रहण हे विषय वगळण्यात येऊन त्याऐवजी विरामचिन्हे या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला. तसेच माहितीपट व पटकथा या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे त्या विषयासाठी 10 ऐवजी 15 तासिका निश्चित करण्यात आल्या.

सत्र एक मधील वरील पेपर संदर्भात केलेल्या सूचना सर्व सदस्यांनी मान्य केल्या.

**Semester III**

1.1.1 डॉ. निधी पटवर्धन यांनी *काव्यशात्र (भारतीय व पाश्चात्य)* या पेपरमध्ये काव्यशात्र या नामाभिधानाने सदर विषयाचा उल्लेख करण्याची पद्धत जुनी झालेली असून त्यांनी काव्यशास्त्राऐवजी साहित्यशास्त्र परिचय असे नाव सुचवले. यावर प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी या पेपरच्या अंतर्गत येणारा अभ्यासक्रम काव्यशास्त्राशीच निगडीत असल्यामुळे काव्यशास्त्र हे नाव ठेवण्यात आल्याचे स्पष्ट केले.

1.1.2 सदर पेपर मधील काव्य – व्याख्या, स्वरूप व शास्त्र म्हणून मीमांसा या विषयात काव्याचे प्रकार हा विषय जोडण्यात यावा असे प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी सुचवले त्याला सर्व सदस्यांनी मान्यता दिली.

1.2.1 ऐच्छिक पेपर मधील *प्राचीन मराठी वाङ्मय(प्रारंभ – 1650)* हा अभ्यासक्रम चर्चेला घेण्यात आला या पेपरमधील उपयोजित स्तरावरील नियोजित पाठ्यपुस्तक बदलले जावे असे सुचवण्यात आले.

1.3.1 *मराठी ललित गद्य स्वरूप आणि उपयोजन* या ऐच्छिक पेपरमध्ये उपयोजित स्तरावरील

'ललित रंग' हे नियोजित पाठ्यपुस्तक बदलून 'मुठीतलं आकाश' या सिसिलिया कार्व्हालो लिखित पुस्तकाचा समावेश करण्यात यावा असे डॉ. निधी पटवर्धन यांनी सुचवले. त्यांच्या या सुचनेला संमती देताना त्यातील निवडक 12 निबंधांचा समावेश केला जावा असे सुचवण्यात आले.

1.4.1 *साहित्याभिरूचीचे स्वरूप* या पेपर मधील शेवटचा विषय राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विविध साहित्य पुरस्कारांची माहिती यामध्ये राज्य आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध साहित्य पुरस्कारांची माहिती असा फेरबदल सुचवण्यात आला.

1.4.2 वरील पेपरमध्ये लोकराज्यच्या अंकाचा संदर्भासाठी उपयोग केला जावा असे सुचवण्यात आले. सदस्यांनी सदर पेपरसाठी संदर्भ सुचवावेत असेही ठरवण्यात आले.

1.5.1 *गोमंतकीय मराठी साहित्यः समीक्षा आणि संशोधन (कविता, कथा, कादंबरी, बालसाहित्य)* या ऐच्छिक पेपरचे अद्याप एकदाही अध्यापन झालेले नसल्यामुळे त्यात कोणताही फेरबदल करण्यात आलेला नाही.

सत्र तीन मधील वरील पेपर संदर्भात केलेल्या सूचना सर्व सदस्यांनी मान्य केल्या.

**Semester IV**

1.1.1 कोअर पेपर *रसविचार आणि समीक्षाविचार* या पेपरमध्ये कोणत्याही फेरबदलाची आवश्यकता नसल्याचे ठरले.

1.2.1 *प्राचीन मराठी वाङ्मय (1651 – 1818)* या ऐच्छिक पेपरमध्ये प्रातिनिधीक कवी याऐवजी मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, श्रीधर, मोरोपंत असा स्पष्ट नावांचा उल्लेख करावा असे सुचवण्यात आले. तसेच पाच शाहिर कवी अशा उल्लेखाऐवजी नावे लिहून स्पष्ट करावे असे सुचवण्यात आले.

1.3.1 *प्रवासवर्णनः एक अभ्यास* या पेपरमध्ये उपयोजित स्तरावरील नियोजित पाठ्यपुस्तक बदलून त्या ऐवजी गोमंतकीय मराठी लेखकांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनाचा समावेश करण्यात यावा असे सुचवण्यात आले.

1.4.1 *कार्यक्रम संयोजन व संचालन कौशल्य* या पेपरमध्ये पहिले दोन विषय एकत्र आणून

त्यांच्या तासिका 15 करण्यात याव्यात व शेवटचा सहावा विषय, कार्यक्रमाची प्रसिद्धी व दस्ताऐवज 05 तासिका असे ठरवण्यात आले.

1.4.2 या पेपरसाठी उपयुक्त असलेले संदर्भ सूचवण्याची जबाबदारी डॉ. निधी पटवर्धन यांनी स्वीकारली.

1.5.1 *गोमंतक आणि कोकण या प्रदेशातील लोककला* या पेपरमध्ये गोमंतकीय लोककला या विषयात घोडेमोडणी आणि रणमाले हे प्रकार जोडावेत तसेच कोकणातील लोककला या विषयात प्रकारांची मांडणी दशावतार, चित्रकथी, कळसुत्री बाहुल्या, नमन, जाखडी, धालोत्सव व चपई अशी ठेवावी असे डॉ. निधी पटवर्धन यांच्याकडून सुचवण्यात आली.

सत्र चार मधील वरील पेपर संदर्भात केलेल्या सूचना सर्व सदस्यांनी मान्य केल्या.

**Semester -V**

1.1.1 *व्याकरण* या कोअर पेपरमधील समास या विषयामध्ये द्वंद्वसमास हा प्रकार जोडला जावा अशी सूचना प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी मांडली ती सर्वमताने मान्य करण्यात आली.

1.2.1 *मराठी वाङ्मयाचे सांस्कृतिक स्वरूप* या ऐच्छिक पेपरमध्ये समाजवाद, गांधीवाद, कलावाद व जीवनवाद याऐवजी मार्कस् वाद, समाजवाद व गांधीवाद अशी मांडणी करावी. कलावाद व जीवनवाद हे विषय वगळले जावे असे ठरवण्यात आले.

1.3.1 *आत्मचरित्रः साहित्यप्रकार आणि उपयोजन* या पेपरमध्ये तिसरा उपविषय आत्मचरित्राचे मूल्यमापन व समीक्षा यातील समीक्षा हा विषय वगळून केवळ मूल्यमापन हा विषय निश्चित करण्यात आला. या पेपरमध्ये उपयोजित स्तरावरील नियोजित पाठ्यपुस्तक बदलण्यात यावे असे ठरले.

1.4.1 *भाषिक कौशल्ये व व्यक्तिमत्व विकास* या ऐच्छिक पेपरमध्ये शेवटच्या विषयामध्ये सुभाषित व सुविचार या विषयांचा समावेश करण्यात यावा व विचारसुमने हा विषय वगळण्यात यावा असे सुचवण्यात आले ते सर्वमताने मान्य केले गेले.

1.5.1 *पत्रकारिता स्वरूप आणि कौशल्ये* या ऐच्छिक पेपरचे अद्याप एकदाही अध्यापन झालेले नसल्यामुळे त्यात कोणताही फेरबदल सुचवण्यात आलेला नाही.

1.6.1 *मराठी पथनाट्य व एकांकिका स्वरुप व सिद्धांतन* या आंतरविद्याशाखीय पेपरच्या अभ्यासक्रमामध्ये पाचव्या सत्रात केवळ पथनाट्य या प्रकाराचे अध्यापन केले जावे असे ठरवण्यात आले. त्यामुळे *मराठी पथनाट्य व एकांकिका स्वरुप व सिद्धांतन* या पेपरचे शीर्षक बदलून ***मराठी पथनाट्यः स्वरुप व सादरीकरण*** असे बदलण्यात आले.

सत्र पाच मधील वरील पेपर संदर्भात केलेल्या सूचना सर्व सदस्यांनी मान्य केल्या.

**Semester- VI**

1.1.1 *भाषाशास्त्र* या कोअर पेपरचे शीर्षक बदलून त्या ऐवजी ***भाषाविज्ञान*** असे शीर्षक योजले जावे असे डॉ. निधी पटवर्धन यांनी सुचवले.

1.1.2 वरील विषयाच्या अभ्यासक्रमातील पहिला पूरक विषय भाषा आणि भाषाशास्त्र या ऐवजी भाषा आणि भाषाविज्ञान असा उल्लेख करावा. तसेच दुसऱ्या उप विषयामध्ये भाषाभ्यासपद्धती – वर्णनात्मक, ऐतिहासिक, तौलनिक या ऐवजी ऐतिहासिक, वर्णनात्मक व सामाजिक असा बदल सुचवण्यात आला. प्रमाणभाषा व बोली या उपविषयामध्ये नागपुरी, अहिराणी व डांगी या बोलींच्या ऐवजी मालवणी, चित्पावनी व आगरी यांचा समावेश करण्यात आला. तसेच मराठीची पूर्वपीठिका या विषयाचा क्रम बदलण्यात आला. नियोजित चौथ्या ऐवजी तिसऱ्या क्रमांकावर व तिसरा चौथ्या क्रमांकावर घेण्यात यावा असे सुचवण्यात आले.

1.2.1 *मुक्तीपूर्व गोमंतकीय मराठी वाङ्मय* या ऐच्छिक पेपरचे अद्याप एकदाही अध्यापन झालेले नसल्यामुळे त्यात कोणताही फेरबदल सुचवण्यात आलेला नाही.

1.3.1 *मराठी प्रादेशिक कादंबरीः स्वरूप आणि उपयोजन* या ऐच्छिक पेपरचे अद्याप एकदाही अध्यापन झालेले नसल्यामुळे त्यात कोणताही फेरबदल सुचवण्यात आलेला नाही.

1.4.1 *भाषांतर विद्या* या ऐच्छिक पेपरचे अद्याप एकदाही अध्यापन झालेले नसल्यामुळे त्यात कोणताही फेरबदल सुचवण्यात आलेला नाही.

1.5.1 *माहितीपट (ड्यॉक्युमेंटरी) लेखन आणि उपयोजन* या ऐच्छिक पेपरचे अद्याप एकदाही अध्यापन झालेले नसल्यामुळे त्यात कोणताही फेरबदल सुचवण्यात आलेला नाही.

1.6.1 *मराठी पथनाट्य व एकांकिका: लेखन व सादरीकरण* या आंतरविद्याशाखीय पेपरच्या अभ्यासक्रमामध्ये केवळ सादरीकरणाचा भाग असल्यामुळे या सत्रामध्ये एकांकिका या प्रकाराचे अध्यापन केले जावे असे ठरवण्यात आले. त्यामुळे या पेपरचे शीर्षक बदलून ***मराठी एकांकिका : स्वरुप व सादरीकरण*** असे बदलण्यात आले.

सत्र पाच मधील वरील पेपर संदर्भात केलेल्या सूचना सर्व सदस्यांनी मान्य केल्या.

**Resolution on the proposed syllabus for the academic year 2015-16**

बी. ए सत्र एक ते सहा चा अभ्यासक्रम उपर्युक्त सूचना ध्यानात घेऊन सर्वसंमतीने स्वीकृत करण्यात आला.

PART B:

Important Points/ recommendations of BoS that require consideration / approval of Academic Council:

1. The syllabi of the following undergraduate courses for Semester I to VI:

| Sr. No. | COURSES | Nature of the Course | UG Level at which Offered |
|---|---|---|---|
| **(SEMESTER I)** | CORE PAPER | | |
| 1. | **MAR-I.C-1** मराठी कथा स्वरूप आणि उपयोजन (1945 – 2000) | Core | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-I.C-2** आधुनिक मराठी कविता स्वरूप व उपयोजन (आरंभ ते 2000) | Core | B.A. (MARATHI) |
| | OPTIONAL PAPER | | |
| 1. | व्यावहारिक मराठी | Optional | B.A. (MARATHI) |
| | | | |
| **(SEMESTER II)** | CORE PAPER | | |
| 1. | **MAR-II.C-3** मराठी कादंबरी स्वरूप व | Core | B.A. (MARATHI) |

| | | | |
|---|---|---|---|
| | उपयोजन (1945-2000) | | |
| 2. | **MAR-II.C-4** मराठी नाटक स्वरूप व उपयोजन (1950-2000) | Core | B.A. (MARATHI) |
| | OPTIONAL PAPER | | |
| 1. | मराठी वाचन – लेखन कौशल्य | Optional | B.A. (MARATHI) |
| | | | |
| **(SEMESTER III)** | CORE PAPER | | |
| 1. | **MAR-III.C-5** काव्यशास्त्र (भारतीय व पाश्चात्य) | Core | B.A. (MARATHI) |
| | ELECTIVE PAPER | | |
| 1. | **MAR-III.E-1** प्राचीन मराठी वाङ्मय (प्रारंभ – 1650) | Elective | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-III.E-2** मराठी ललित गद्य स्वरूप आणि उपयोजन | Elective | B.A. (MARATHI) |
| 3. | **MAR-III.E-3** साहित्याभिरूचीचे स्वरूप | Elective | B.A. (MARATHI) |
| 4. | **MAR-III.E-4** गोमंतकीय मराठी साहित्य: समीक्षा आणि संशोधन (कविता, कथा, कादंबरी, बालसाहित्य) | Elective | B.A. (MARATHI) |
| | | | |
| **(SEMESTER IV)** | CORE PAPER | | |
| 1. | **MAR-IV.C-6** रसविचार आणि समीक्षाविचार | Core | B.A. (MARATHI) |
| | ELECTIVE PAPER | | |
| 1. | **MAR-IV.E-5** प्राचीन मराठी वाङ्मय (1651 – 1818) | Elective | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-IV.E-6** प्रवासवर्णनः एक अभ्यास | Elective | B.A. (MARATHI) |
| 3. | **MAR-IV.E-7** कार्यक्रम संयोजन व संचालन कौशल्य | Elective | B.A. (MARATHI) |
| 4. | **MAR-IV.E-8** गोमंतक आणि कोकण या प्रदेशातील लोककला | Elective | B.A. (MARATHI) |
| **(SEMESTER V)** | CORE PAPER | | |
| 1. | **MAR-V.C-7** व्याकरण | Core | B.A. (MARATHI) |
| | ELECTIVE PAPER | | |
| 1. | **MAR-V.E-9** मराठी वाङ्मयाचे सांस्कृतिक स्वरूप | Elective | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-V.E-10** आत्मचरित्रः साहित्यप्रकार आणि उपयोजन | Elective | B.A. (MARATHI) |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | **MAR-V.E-11** पत्रकारिताः स्वरूप आणि कौशल्ये | Elective | B.A. (MARATHI) |
| 4. | **MAR-V.E-12** भाषिक कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास | Elective | B.A. (MARATHI) |
| INTER DISCIPLINARY PAPER | | | |
| 1. | **MAR-V.ID-1** मराठी पथनाट्यः स्वरुप व सादरीकरण | Inter Disciplinary | B.A. (MARATHI) |
| | | | |
| **(SEMESTER VI)** CORE PAPER | | | |
| 1. | **MAR-VI.C-8** भाषाविज्ञान | Core | B.A. (MARATHI) |
| ELECTIVE PAPER | | | |
| 1. | **MAR-VI.E-13** मुक्तीपूर्व गोमंतकीय मराठी वाङ्मय | Elective | B.A. (MARATHI) |
| 2. | **MAR-VI.E-14** मराठी प्रादेशिक कादंबरी : स्वरुप आणि उपयोजन | Elective | B.A. (MARATHI) |
| 3. | **MAR-VI.E-15** भाषांतर विद्या | Elective | B.A. (MARATHI) |
| 4. | **MAR-VI.E-16** माहितीपट (डॉक्युमेंटरी) : लेखन आणि उपयोजन | Elective | B.A. (MARATHI) |
| INTER DISCIPLINARY PAPER | | | |
| 1. | **MAR-VI.ID-2** मराठी एकांकिका: स्वरुप व सादरीकरण | Inter Disciplinary | B.A. (MARATHI) |

**Semester I**

*मराठी कथा स्वरूप आणि उपयोजन (1945 – 2000)* या कोअर पेपरमध्ये उपयोजनासाठी निवडलेल्या कथा बदलून घेण्यात याव्यात असे ठरवण्यात आले.

उपयोजित स्तरावर निवडण्यात आलेल्या कथाः

1. गंगाधर गाडगीळ - किडलेली माणसे
2. पु. भा. भावे - सतरावे वर्ष
3. अरविंद गोखले - कातरवेळ
4. व्यंकटेश माडगूळकर - मारुतराया
5. कुसुमावती देशपांडे - समांतर रेषा
6. जी. ए. कुलकर्णी – कैरी

7. महादेव शास्त्री जोशी - मानिनी
8. बा. भ. बोरकर - सोनकेळ
9. विद्याधर पुंडलीक - आजी शरण येते
10. गजानन रायकर - नातालीन
11. आनंद यादव - मोट
12. महादेव मोरे - गायगुली
13. प्रिया तेंडुलकर - नवा गडी

*मराठी कविता स्वरूप व उपयोजन (आधुनिक कविता 1945 पर्यंत)* या पेपर मधील कवितेचा कालखंड बदलण्यात आला. त्यामुळे या पेपरचे शीर्षक ***आधुनिक मराठी कविता स्वरूप व उपयोजन (आरंभ ते 2000)*** असे ठरवण्यात आले. याला सर्व सदस्यांची मान्यता मिळाली. कवितेच्या पेपरमध्ये उपयोजनासाठी पाठ्यपुस्तकाऐवजी कवी व कवितांची निवड करण्यात आली.

1. केशवसुत- तुतारी, अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न
2. बालकवी- फुलराणी, खेड्यातील रात्र
3. भा. रा. तांबे - नववधु प्रिया मी, रिकामे मधुघट
4. बा.भ. बोरकर- तव नयनांचे दल हलले गं, चित्रवीणा
5. कुसुमाग्रज- कोलंबसाचे गर्वगीत, गाभारा
6. बहिणाबाई चौधरी- माझी माय सरसोती, देव अजब गारोडी
7. इंदिरा संत- मृण्मयी, कुब्जा
8. वसंत बापट- बाभुळ झाड, केवळ माझा सह्यकडा
9. शांता शेळके- ही वाट दूर जाते, पैठणी
10. नारायण सुर्वे- आई, दोन दिवस
11. मंगेश पाडगांवकर- अंतिम सत्य, वेंगुर्ल्याचा पाऊस
12. विं.दा. करंदीकर- माझ्या मना बन दगड, धोंड्या न्हावी

व्यावहारिक मराठी या पेपरमध्ये टिप्पणी लेखनाऐवजी शुद्धलेखनाचे नियम, कार्यालयीन पत्रलेखनाच्या तासिका 10 ऐवजी 5 करण्यात आल्या. अभ्यासक्रमातील शेवटचा विषय, 'निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्र, शुभसंदेश, मुखपृष्ठ व मलपृष्ठ' हा संपूर्ण विषय बदलून त्याऐवजी मुद्रितशोधन या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला.

**Semester II**

*मराठी कादंबरी स्वरूप व उपयोजन (आरंभ ते 1920)* या पेपरमधील कादंबरीचा कालखंड बदलून 1945 ते 2000 असा निश्चित करण्यात आला. वरील बदलानंतर या पेपरचे शीर्षक ***मराठी कादंबरी स्वरूप व उपयोजन (1945 – 2000)*** असे करण्यात आले. उपयोजनासाठी हमीद दलवाई लिखित 'इंधन' या कादंबरीची निवड करण्यात आली.

*मराठी नाटक स्वरूप व उपयोजन (1950 - 2000)* या पेपरमध्ये उपयोजित स्तरावरील पाठ्यपुस्तक बदलून विजय तेंडुलकर लिखित 'कमला' या नाटकाची निवड करण्यात आली.

पायाभूत अभ्यासक्रमातील *मराठी वाचन लेखन कौशल्य* या पेपरमधील संवाद लेखन, सारांश लेखन व रसग्रहण हे विषय वगळण्यात येऊन त्याऐवजी विरामचिन्हे या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला. तसेच माहितीपट व पटकथा या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे त्या विषयासाठी 10 ऐवजी 15 तासिका निश्चित करण्यात आल्या.

**Semester III**

काव्यशास्त्र या पेपरमधील काव्य – व्याख्या, स्वरूप व शास्त्र म्हणून मीमांसा या पहिल्या विषयात काव्याचे प्रकार हा उपविषय जोडण्यात आला.

*प्राचीन मराठी वाङ्मय(प्रारंभ – 1650)* या पेपरमधील उपयोजित स्तरावरील नियोजित पाठ्यपुस्तक बदलून प्र. न. जोशी संपादित 'तुकारामांचे निवडक अभंग' याचा समावेश करण्यात आला.

*मराठी ललित गद्य स्वरूप आणि उपयोजन* या पेपरमध्ये उपयोजित स्तरावरील 'ललित रंग' हे नियोजित पाठ्यपुस्तक बदलून 'मुठीतलं आकाश' या सिसिलिया कार्व्हालो लिखित पुस्तकातील निवडक 12 निबंधांचा समावेश केला जावा असे ठरवण्यात आले.

*साहित्याभिरूचीचे स्वरूप* या पेपर मधील शेवटचा विषय राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विविध साहित्य पुरस्कारांची माहिती यामध्ये राज्य आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध साहित्य पुरस्कारांची माहिती असा फेरबदल करण्यात आला.

**Semester IV**

*प्राचीन मराठी वाङ्मय (1651 – 1818)* या ऐच्छिक पेपरमध्ये प्रातिनिधीक कवी याऐवजी मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, श्रीधर, मोरोपंत अशी कवींची निवड करण्यात आली. तसेच पाच शाहिर कवी अशा उल्लेखाऐवजी अनंत फंदी, परशराम, रामजोशी, होनाजी बाळा, प्रभाकर असा बदल सुचवण्यात आला.

*प्रवासवर्णनः एक अभ्यास* या पेपरमध्ये उपयोजित स्तरावरील नियोजित पाठ्यपुस्तक बदलून त्या ऐवजी 'भिंगरीचे पाय' – उषा पाणंदीकर या पुस्तकाचा समावेश करण्यात आला.

*कार्यक्रम संयोजन व संचालन कौशल्य* या पेपरमध्ये पहिले दोन विषय एकत्र आणून त्यांच्या तासिका 15 करण्यात आल्या व कार्यक्रमाची प्रसिद्धी व दस्ताऐवज 05 तासिका हा विषय जोडण्यात आला.

*गोमंतक आणि कोकण या प्रदेशातील लोककला* या पेपरमध्ये गोमंतकीय लोककला या विषयात घोडेमोडणी आणि रणमाले हे प्रकार जोडण्यात आले तसेच कोकणातील लोककला या विषयात प्रकारांची मांडणी दशावतार, चित्रकथी, कळसुत्री बाहुल्या, नमन, जाखडी, धालोत्सव व चपई अशी करण्यात आली.

**Semester V**

*व्याकरण* या कोअर पेपरमधील समास या विषयामध्ये द्वंद्वसमास हा प्रकार जोडण्यात आला.

*मराठी वाङ्मयाचे सांस्कृतिक स्वरूप* या ऐच्छिक पेपरमध्ये समाजवाद, गांधीवाद, कलावाद व जीवनवाद याऐवजी मार्कस् वाद, समाजवाद व गांधीवाद असा फेरबदल करण्यात आला.

आत्मचरित्रः साहित्यप्रकार आणि उपयोजन या पेपरमध्ये तिसरा उपविषय आत्मचरित्राचे मूल्यमापन व समीक्षा यातील समीक्षा हा शब्द वगळण्यात आला. या पेपरमध्ये उपयोजित स्तरावरील नियोजित पाठ्यपुस्तक बदलून, 'चाकाची खूर्ची' - नासिमा हुर्जुक या आत्मचरित्राचा समावेश करण्यात आला.

*भाषिक कौशल्ये व व्यक्तिमत्व विकास* या ऐच्छिक पेपरमध्ये शेवटच्या विषयामध्ये सुभाषित व सुविचार या विषयांचा समावेश करण्यात आला व विचारसुमने हा विषय वगळण्यात आला.

*मराठी पथनाट्य व एकांकिका स्वरुप व सिद्धांतन* या आंतरविद्याशाखीय पेपरच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप बदलण्यात आले. या पेपरमध्ये केवळ पथनाट्य या प्रकाराचे अध्यापन केले जावे असे ठरवण्यात आले. त्यामुळे या पेपरच्या अभ्यासक्रमामध्ये वरील विषयाला अनुसरून बदल करण्यात आला तसेच या पेपरचे शीर्षक ***मराठी पथनाट्यः स्वरुप व सादरीकरण*** असे बदलण्यात आले.

**Semester VI**

*भाषाशास्त्र* या कोअर पेपरचे शीर्षक बदलून त्या ऐवजी भाषाविज्ञान असे शीर्षक ठरवण्यात आले.

वरील विषयाच्या अभ्यासक्रमातील पहिला पूरक विषय भाषा आणि भाषाशास्त्र या ऐवजी भाषा आणि भाषाविज्ञान असा उल्लेख करावा. तसेच दुसऱ्या उप विषयामध्ये भाषाभ्यासपद्धती – वर्णनात्मक, ऐतिहासिक, तौलनिक या ऐवजी ऐतिहासिक, वर्णनात्मक व सामाजिक असा बदल सुचवण्यात आला. प्रमाणभाषा व बोली या उपविषयामध्ये नागपुरी, अहिराणी व डांगी या बोलींच्या ऐवजी मालवणी, चित्पावनी व आगरी यांचा समावेश करण्यात आला. तसेच मराठीची पूर्वपीठिका या विषयाचा क्रम बदलण्यात आला. नियोजित चौथ्या ऐवजी तिसऱ्या क्रमांकावर व तिसरा चौथ्या क्रमांकावर घेण्यात यावा असे सुचवण्यात आले.

*मराठी पथनाट्य व एकांकिका: लेखन व सादरीकरण* या आंतरविद्याशाखीय पेपरमध्ये एकांकिका या प्रकाराचे अध्यापन केले जावे असे ठरवण्यात आले. त्यामुळे या पेपरच्या अभ्यासक्रमामध्ये वरील विषयाल अनुसरून बदल करण्यात आला तसेच या पेपरचे शीर्षक बदलून ***मराठी एकांकिकाः स्वरूप व सादरीकरण*** असे बदलण्यात आले.

The foregoing minutes of the meeting were read out by the Chairman at the meeting itself and they were unanimously approved by all the members present

The Chairman thanked the members of the Board of studies in Marathi for their valuable contribution and active participation.

The meeting ended at 5.00 p.m. with a vote of thanks to the chair.

The following members of the Board of Studies in Marathi were present for the meeting.

1. Shri. Shrikrishna Adsul - Chairman
2. Dr. Sunita Umraskar - Academic Council Nominee
3. Dr. Nidhee Patwardhan - Academic Council Nominee
4. Dr. Pramada Desai - Vice-Chancellor's Nominee, Goa University
5. Ms. Kurtarkar Rutuja Alias Ravina Shekhar - Industry/Corporate sector Representative
6. Ms. Ugam Umesh Parab - Alumni
7. Ms. Sarika Advilkar - Member Secretary
8. Ms. Sonia Sawant - Member

Advilkar

Ms. Sarika Advilkar
Member Secretary
Board of Studies

Adsul

Shri. Shrikrishna Adsul
Chairman
Board of Studies

Date: 27.11.2017

PART C: The remarks of the Dean of the Faculty:-

a. The minutes are in order
b. The minutes may be placed before the Academic Council with remark, if any.
c. Important points of the minutes which need clear policy decision of the Academic council to be recorded.

Date: 29/11/17

Signature of the Dean:
(Faculty of Languages & Literature)

MDBorkar.

Mrs. Mitra D.S. Borkar